# 4 डिसेंबर

## आजचा सुविचार :

अडचणीत असतांना अडचणीपासून दूर पळणे म्हणजे अजून मोठ्या अडचणीत जाण्यासारखेच आहे.

## आजचे पंचांग :

वार – शनिवार
तिथी - कार्तिक
नक्षत्र – अनुराधा
सूर्योदय – सकाळी 6.59 वाजता
सूर्यास्त – सायंकाळी 5. 58 वाजता

## आजचे दिनविशेष :

1971 : भारतीय नौसेना दिवस

## आजचे इंग्लिश शब्द : ( Parts of body / शरीराचे अवयव ) :

1) Knee – गुडघा  2) Elbow - कोपर  3) Fingers – बोटे  4) Bones : हाडे  4) Nails : नखे

## आजची प्रश्नमंजुषा :

1) आपण एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी कोणत्या साधनांचा उपयोग करतो?
2) वनस्पतीचे भाग कोणते?
3) 12 x 9 = किती?
4) 1 किलो म्हणजे किती ग्रॅम?
5) पचन संस्थेतील अवयव सांगा.

## बोधकथा :

### घामाचा पैसा

एका शेठजींचा मुलगा, अज्जू खूप आळशी होता. घरात गडगंज संपत्ती आणि एकुलता एक म्हणून लाडका. काम त्याला कधी करावे लागलेच नाही. असे करत करत तो एकवीस वर्षांचा झाला.
शेठजींना लागली काळजी. साठवलेला पैसा किती दिवस पुरणार? दुसऱ्याच दिवशी त्यांनी मुलाला बोलावले बाहेर पडायला सांगितले. पैसा कमवून आणलं तर जेवायला मिळेल ही अट ठेवली.
अज्जूला काहीच कळेना. त्याने बहिणीकडून एक रूपया मागितला. आणि दिला जाऊन शेठजींना. पण तो त्यांनी विहीरीत फेकला. दुसऱ्या दिवशी पुन्हा हीच अट ठेवली. आता अज्जू आईकडे गेला. तोही पैसा वडिलांनी फेकला. आता मात्र आला तिसरा दिवस. अज्जू दिवसभर काम शोधत फिरला. पण काम काही मिळेना. हताश होऊन गेला. काहीच सुचेना. पोटात लागले कावळे कोकलायला. शेवटी स्टेशनवर एक माणूस हमालाची वाट पहात असलेला दिसला.
हे पाहताक्षणीच अज्जू धावत सुटला आणि बॅग त्याने डोक्यावर उचलून त्याच्या घरी पोहचवली. एवढे करेपर्यंत घामाघुम झाला. पण त्या माणसाने अज्जूच्या हातावर टेकवले फक्त आठ आणे. शेठजींच्या हातावर आठ आणे ठेवताच त्यांनी ते विहिरीत फेकले. वडिलांच्या या कृतीने अज्जू संतापला. म्हणाला, बाबा तुम्हाला जाणीव नाही की ते आठ आणे मिळवायला मला किती वणवण करावी लागली. शेठजी हसत हसत म्हणाले, हेच मला हवे होते. आज तुला खऱ्या कष्टाची किंमत कळली.

तात्पर्य: स्वकष्टाची कमाई तीच खरी कमाई.

## भारतीय नौदल दिन :

आजचा दिवस हा  भारतीय नौदल दिन म्हणून साजरा करण्यात येतो. 1971 मध्ये भारतीय नौदलाने पाकिस्तान विरूद्धच्या युद्धात कराची बंदरावर केलेला यशस्वी हल्ला, विशाखापट्टणवरचा हल्ला परतवण्यात मिळवलेले यश आणि पूर्व पाकिस्तान नेव्हीचे उच्चाटन करण्यात बजावलेली महत्त्वपूर्ण कामगिरी याच्या स्मरनार्थ 4 डिसेंबरला नौदल दिन साजरा केला जातो. भारताने पाकिस्तान विरुद्धची मोहिम आखली होती त्याला ऑपरेशन ट्रायडंट असे नाव देण्यात आले होते. 4 डिसेंबरला ही कामगिरी यशस्वी झाली. त्यामुळे नेव्हीच्या शौर्याला सलाम करण्यासाठी नौदल दिन साजरा केला जातो.

1934 मध्ये ब्रिटीशांनी 'रॉयल इंडियन नेव्ही' (आरआयएन) या सेनेपासून नौदलाची सुरुात केली. 1971 च्या भारत व पाकिस्तान युद्धामध्ये नौदलाने चढविलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे विजयश्री मिळविणे अधिक सुकर झाले. हा क्षेपणास्त्र हल्ला चढविण्यात आला तो दिवस 4 डिसेंबर 'नौदल दिन'' म्हणून साजरा करण्यात येतो.

भारतीय महासागर क्षेत्रात संतुलन आणि सुरक्षा राखण्याचे काम नौदलाचे आहे. जगातील सर्वोत्तम नौदलामध्ये भारतीय नौसेना पाचव्या क्रमांकावर आहे.  नौदलाच्या हवाई शाखेत ध्रुव, चेतक, सी किंग इत्यादी लढाऊ विमानांच्या तुकड्या आहेत. तर भारतीय नौदलाच्या आय.एन.एस. विराट डेली क्लास, त्रिशूळ, आयएनएस बेटवा आणि मिसाईलचा मारा करणारी नौका विनाश या नौका तसेच संकुश पाणबुडी हे सुद्धा नौदलाची ताकद वाढवतात.